



| वर्ष - 9 | अंक -14 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दि. 31 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



**आतील पानांत**

- राजस्थान रॉयल्सला मोठा धक्का!
- कायरन पोलार्डची इतिहासाला गवसणी!
- पंतप्रधान मोदी चीनमध्ये दाखल!
- अमेरिकन ब्रँड टॉयलेटमध्ये दिसत आहे


**पुणे महानगर पालिका निवडणूक: स्थानिक स्वराज्य संस्था भाजपासोबत नाही!**

# राष्ट्रवादी स्वबळावर लढणार!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सूचना : प्रभागानिहाय लढण्याची तयारी ठेवा

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज



**राज्यात सध्या महायुतीचं सरकार असलं तरी स्थानिक निवडणुकीत सर्व पक्ष स्वबळावर लढण्याची तयारी करत आहेत. नुकतंच अजित पवार यांनी पुणे महापालिका स्वबळावर लढण्याचा इशारा दिला आहे. पुणे मनपात भाजप राष्ट्रवादीला सोबत घेण्याची कोणतीही शक्यता दिसत नसल्यामुळे अजित पवारांनीही आपल्या शिलेदारांना स्वबळावर लढण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.**

अजित पवारांनी पुण्यात माजी नगरसेवकांच्या बैठकीत मोठं विधान केलं आहे. राष्ट्रवादीच्या सर्व माजी नगरसेवकांच्या बैठकीत अजित पवारांनी स्वबळावर लढण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. प्रभाग रचना आली असून, तशी लढण्याची तयारी ठेवा असं अजित पवार म्हणाले आहेत. सुचना हरकतीत जे काही बदल होतील ते होतील, पण स्वबळावर लढण्याची तयारी ठेवा असं अजित पवारांनी सांगितलं आहे.

पुणे मनपात भाजपा राष्ट्रवादीला सोबत घेण्याची कोणतीही शक्यता दिसत नसल्यामुळे अजित पवारांनीही आपल्या शिलेदारांना स्वबळावर लढण्याचे दिले स्पष्ट संकेत दिले आहेत. प्रभाग रचनाही भाजपच्याच सोईची असल्याने राष्ट्रवादी नगरसेवकांच्या तक्रारी होत्या. त्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी आज पक्ष नगरसेवकांची बैठक बोलावली होती.

### प्रफुल्ल पटेल काय म्हणाले?

प्रफुल्ल पटेल म्हणाले, पुणे हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे इथे सक्षम पक्षकार्यालय असणे गरजेचे होते. अजित पवार आणि पार्थ पवार यांच्या पुढाकाराने हे कार्यालय उभे राहिले आहे. आपण महायुतीत असलो तरी जिथे युती शक्य नाही, तिथे परिस्थिती पाहून स्वतंत्र लढण्याचा निर्णय घ्यावा. मैत्रीपूर्ण लढती झाल्या तरी चालतील; पण केवळ तिकिट न मिळाल्याने आपला कार्यकर्ता दुसऱ्या पक्षात जाऊ नये. पुण्यात आपण 162 जागांसाठी तयारी केली पाहिजे, असे सांगत पटेल यांनी प्रत्यक्षात 'एकला चलो रे'चा संदेशच दिला. यावेळी त्यांनी विरोधकांवरही टीका केली. मतचोरीचा आरोप करून राहुल गांधी महाराष्ट्राला बदनाम करत आहेत. विरोधक गोबेल्स नीतीचा वापर करत आहेत. या खोट्या प्रचाराला आपण ठाम प्रत्युत्तर दिले पाहिजे, असे पटेल म्हणाले.

## पुण्यातील समीकरण

**भाजपने प्रभाग रचना आपल्या सोयीची ठेवली**
**राष्ट्रवादी नगरसेवकांकडून तक्रारी नोंद**
**162 जागांसाठी राष्ट्रवादीची तयारी सुरू**

"आमचा पक्ष प्रचंड राजकीय इच्छाशक्ती असलेला आहे. राज्यात आम्ही महायुतीतून लढणार असलो, तरी अनेक शहरांतील राजकीय समीकरणे वेगवेगळी आहेत. अंतिम निर्णय राज्यातील तीन प्रमुख नेते घेतील.

**-सुनील तटकरे,** प्रदेशाध्यक्ष.

(सीएचबी) नियुक्ती मान्यता

उच्च शिक्षण संचालकांचे महत्त्वपूर्ण निर्देश...

# राज्यातील सीएचबी प्राध्यापकांना दिलासा!

## सात दिवसांत वेतन देण्याचे निर्देश

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावरील प्राध्यापक (सीएचबी) नियुक्ती, मान्यता, मानधन देण्याची कार्यपद्धती उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निश्चित केलेली असूनही त्याचे विद्यापीठांच्या स्तरावर पालन होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसांत विद्यापीठांनी तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचे प्रस्ताव निकाली काढण्याचे, सहसंचालकांनी सात दिवसांत वेतन देण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिले आहेत.**



डॉ. देवळाणकर यांनी याबाबत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या सेवा उपलब्ध होऊन शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे पार पाडता यावे यासाठी तासिका तत्त्वावरील अध्यापकांची प्रत्येक वर्षी नियुक्ती करण्यासंदर्भात १७ ऑक्टोबर २०२२च्या शासन निर्णयाद्वारे कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.त्यानुसार उपलब्ध कार्यभार निश्चित करणे, संबंधित विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरून ना हरकत प्रमाणपत्र देणे, व्यवस्थापन स्तरावरील जाहिरात, निवड पद्धती, विद्यापीठ मान्यता याबाबतचा कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून देण्यात आला आहे. मात्र, अद्यापही विद्यापीठांच्या स्तरावर तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीस मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.मान्यतेअभावी संबंधित महाविद्यालयांकडून मानधन देण्याचे प्रस्ताव विभागीय सहसंचालक कार्यालयास सादर करता आलेले नाहीत, असेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे तासिका तत्त्वावरील अध्यापकांना वेळेत मानधन दिले जात नसल्याबाबतच्या तक्रारी, निवेदने विविध संघटनांकडून दाखल झाल्या आहेत, असे डॉ. देवळाणकर यांनी नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर, सर्व अकृषि विद्यापीठांनी विद्यापीठाच्या स्तरावर प्रलंबित असलेले तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्तिस मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव दोन दिवसांत निकाली काढावेत. सर्व उच्च शिक्षण विभागीय सहसंचालकांनी विशेष शिबिराचे आयोजन करून संबंधित महाविद्यालयांकडून मानधन देण्याची देयके स्वीकारावीत.

### मानधन देण्याची देयके स्वीकारावीत

डॉ. देवळाणकर यांनी नमूद केले या पार्श्वभूमीवर, सर्व अकृषि विद्यापीठांनी विद्यापीठाच्या स्तरावर प्रलंबित असलेले तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्तिस मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव दोन दिवसांत निकाली काढावेत. सर्व उच्च शिक्षण विभागीय सहसंचालकांनी विशेष शिबिराचे आयोजन करून संबंधित महाविद्यालयांकडून मानधन देण्याची देयके स्वीकारावीत.

तसेच प्राप्त झालेल्या देयकांनुसार तासिका तत्त्वावरील नियुक्त अध्यापकांना मानधन देण्याची कार्यवाही सात दिवसांमध्ये पूर्ण करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.डॉ. देवळाणकर यांनी याबाबत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या सेवा उपलब्ध होऊन शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे पार पाडता यावे यासाठी तासिका तत्त्वावरील अध्यापकांची प्रत्येक वर्षी नियुक्ती करण्यासंदर्भात १७ ऑक्टोबर २०२२च्या शासन निर्णयाद्वारे कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.त्यानुसार उपलब्ध कार्यभार निश्चित करणे, संबंधित विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरून ना हरकत प्रमाणपत्र देणे, व्यवस्थापन स्तरावरील जाहिरात, निवड पद्धती, विद्यापीठ मान्यता याबाबतचा कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून देण्यात आला आहे. मात्र, अद्यापही विद्यापीठांच्या स्तरावर तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीस मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.मान्यतेअभावी संबंधित महाविद्यालयांकडून मानधन देण्याचे प्रस्ताव विभागीय सहसंचालक कार्यालयास सादर करता आलेले नाहीत, असेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे तासिका तत्त्वावरील अध्यापकांना वेळेत मानधन दिले जात नसल्याबाबतच्या तक्रारी, निवेदने विविध संघटनांकडून दाखल झाल्या आहेत.

# निधीबाबतच्या तक्रारींची चौकशी

## अनुसूचित जाती, जमाती आयोगाचे उपाध्यक्ष मेश्राम यांची माहिती

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था (बार्टी), आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टार्टी), छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण (महाज्योती) संस्था, या संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये अनियमितता झाल्याच्या अनेक तक्रारी आहेत.**




मात्र, या तक्रारींची दखल या संस्थांकडून घेण्यात आलेली नाही, ही मोठी गंभीर बाब आहे. या तक्रारींची चौकशी करून त्याचा अहवाल १५ दिवसांत सादर करावा, असा आदेश महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिला आहे.

स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या समाजातील विविध घटकांतील विद्यार्थ्यांना या संस्थांच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जाते.

त्यासाठीच्या निधीमध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारी आल्या आहेत. मात्र, त्याची दखल घेण्यात न आल्याने आयोगाकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या.

या तक्रारींची दखल घेऊन आयोगाचे उपायुक्त मेश्राम यांनी शुक्रवारी पुण्यात तक्रारी असलेल्या या संस्थांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेऊन जनसुनावणी घेतली. जनसुनावणीमध्ये झालेल्या निर्णयाची माहिती मेश्राम यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

मेश्राम म्हणाले, 'जनसुनावणीसाठी उपस्थित अधिकाऱ्यांना तक्रारींबाबत योग्य खुलासा करता आला नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

### वस्तुनिष्ठ अहवाल आयोगाकडे द्यावा

जनसुनावणीमध्ये बँकिंग सोल्युशन (बीएस) एज्युकेशन संस्थेबाबत विविध माध्यमांतून करण्यात आलेल्या तक्रारींची दखल घेऊन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेला सखोल चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल आयोगाकडे द्यावा, असा आदेश दिला आहे. या अहवालानुसार संबंधित संस्थेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.'

नागरिक प्रतीक्षेत — कामासाठी दिलेली मुदत दोनदा संपली

# पिंपरीतील डेअरी फार्म उड्डाणपुलाचे काम संथगतीने!

## डिसेंबर अखेरपर्यंत काम पूर्ण करण्यात येईल; महापालिका अधिकाऱ्यांचा दावा

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महापालिकेकडून डेअरी फार्म येथे सुरु असलेल्या उड्डाणपुलाच्या कामाला विलंब होत असून, मार्च २०२५ ची पहिली डेडलाईन आणि नंतर ऑगस्ट-सप्टेंबर २०२५ची दूसरी डेडलाईनही चुकली आहे. आता मात्र डिसेंबर अखेरपर्यंत हे काम पूर्ण करण्यात येईल, असा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.**

पिंपरी व परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी आणि वाहतूक कोंडी दूर करण्याच्या उद्देशाने हा पूल उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाला मार्च २०२३ मध्ये कार्यादिश देण्यात आला. मात्र, पुलाच्या जागेत अडथळा ठरणाऱ्या वृक्षांमुळे आणि रेल्वे विभागाशी संबंधित मंजुरी प्रक्रियेमुळे कामात विलंब झाला. एप्रिल २०२३ मध्ये वृक्षतोड व पुनर्रोपणाचा प्रस्ताव महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीकडे सादर करण्यात आला. त्याला ऑगस्ट २०२३ मध्ये मंजुरी मिळाली. त्यानंतर सप्टेंबर २०२३ मध्ये वन विभागाकडून मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर मार्च २०२४ मध्ये वृक्षतोडीस परवानगी मिळाली. मे २०२४ मध्ये एकूण १४२ वृक्ष काढण्यात आले, तर नोव्हेंबर २०२४ मध्ये ६४ वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात आले.

दरम्यान, पिंपरीतील हा पूल रेल्वे विभागाशी संलग्न असल्याने ओव्हरहेड इक्विपमेंट व इतर संरचना बदलण्यासाठी मंजुरी आणि निधी हस्तांतरण प्रक्रियेतही वेळ गेला.

रेल्वे विभागाने ७४.८९ लाखांची आगाऊ मागणी केली होती. ती रक्कम महापालिकेकडून देण्यात आली असून, आता आवश्यक मंजुरी मिळाल्याचे प्रकल्प विभागाने सांगितले. डेअरी फार्म येथील उड्डाणपुलाचे काम जलदगतीने पूर्ण करण्यावर महापालिका भर देण्यात येत असल्याने पिंपरी-चिंचवड महापालिका अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, पिंपरीकर अद्यापही पुलाच्या प्रतिक्षेतच आहेत.

डेअरी फॉर्म पुलाच्या अभावामुळे स्थानिक वाहतूक आणि जनजीवनावर परिणाम होत आहे. सणासुदीत पिंपरीत होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हा पूल महत्त्वाचा आहे.



> “ पुलाच्या कामातील अडथळ्यांमुळे होणारा विलंब लक्षात घेता ठेकेदाराला मुदतवाढ दिली आहे. आता फक्त रेल्वेच्या जागेतील काम बाकी आहे. दिवाळीनंतर रस्त्याचेही काम करण्यात येईल.
> **-प्रमोद ऑंभासे, मुख्य अभियंता, पालिका**

> “ डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपुलाचे काम गतीने व्हायला हवे. पुलाचे काम पूर्ण झाल्यास पिंपरीगाव, कॅम्प, रहाटणी, पिंपळे सौदागर, काळेवाडी व इतर परिसरातील वाहतुकीचा ताण कमी होणार आहे.
> **-संदीप वाघेरे, माजी नगरसेवक**

# थेरगाव मनपा रुग्णालयाला डीएनबी मान्यता

## पिंपरी चिंचवडच्या आरोग्य क्षेत्रासाठी ऐतिहासिक टप्पा – आयुक्त शेखर सिंह

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**


**नॅशनल बोर्ड ऑफ एग्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस नवी दिल्ली यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयाला डीएनबी (जनरल मेडिसिन) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी २०२५ प्रवेश सत्राकरिता चार जागा मंजूर केल्या आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. पिंपरी चिंचवडसाठी हा एक ऐतिहासिक टप्पा आहे, असेही ते म्हणाले.**



नॅशनल बोर्ड ऑफ एग्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस नवी दिल्ली यांनी पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमासाठी थेरगाव रुग्णालयात १२, आकुर्डी रुग्णालयात ८ व भोसरी रुग्णालयात २ अशा एकूण २२ जागांकरिता यापूर्वीच मान्यता दिली आहे. सदर अभ्यासक्रम संबंधित रुग्णालयांमध्ये सुरू देखील झालेले आहेत. तर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात नॅशनल मेडिकल कौन्सिल तर्फे यापूर्वीच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. याच धर्तीवर आता नॅशनल बोर्ड ऑफ एग्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस नवी दिल्ली यांची पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी थेरगाव रुग्णालयास मान्यता मिळाल्यामुळे महापालिकेच्या आरोग्य सेवेला बळकटी मिळणार आहे. नव्याने मिळालेल्या या मान्यतेमुळे नवीन थेरगाव रुग्णालयाचे शैक्षणिक व वैद्यकीय स्वरूप अधिक सक्षम होणार आहे. महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये दररोज मोठ्या प्रमाणावर रुग्णसेवा दिली जाते. विविध आजारांवरील उपचारासोबतच प्रगत निदान सुविधा येथे उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत वैद्यकीय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव, रुग्णसेवेत सक्रिय सहभाग आणि वरिष्ठ तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाल्याने त्यांच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळेल. या प्रक्रियेतून रुग्णसेवेचा दर्जाही उंचावणार असून नागरिकांना अधिक परिणामकारक व तत्पर आरोग्यसेवा मिळेल. नॅशनल बोर्ड ऑफ एग्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस नवी दिल्ली यांच्या अभ्यासक्रमामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेची रुग्णालये केवळ आरोग्यसेवा पुरविण्यापुरती मर्यादित न राहता वैद्यकीय शिक्षण व प्रशिक्षणासाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणूनही विकसित होणार आहेत. या माध्यमातून वैद्यकीय विद्यार्थ्यांना आधुनिक पद्धतीने वैद्यकीय ज्ञान आत्मसात करण्याची व भविष्यातील आरोग्यसेवेत महत्त्वाची भूमिका

> “ पिंपरी चिंचवड महापालिका आपल्या आरोग्य यंत्रणेत सातत्याने सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील आहे. उच्च दर्जाची आरोग्यसेवा, आधुनिक सुविधा आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासोबतच शैक्षणिक व संशोधनाच्या संधी निर्माण करणे हा महापालिकेचा उद्देश आहे. नवीन थेरगाव रुग्णालयाला डीएनबी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळाल्याने आपल्या रुग्णालयांची विश्वासार्हता आणि क्षमता अधोरेखित झाली आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या माध्यमातून भविष्यातील कुशल डॉक्टर्स तयार होणार असून यामुळे नागरिकांना अधिक उच्च गुणवत्तेची आरोग्यसेवा मिळण्यास मदत होईल.
> **–शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सत्संगतीचे दोन प्रकार

सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. संतांची संगत दोन प्रकारे होऊ शकते. एक, संतांच्या देहाची; दुसरी, संतांनी सांगितलेले साधन करीत राहण्याची. यांपैकी पहिली, म्हणजे संताच्या देहाची संगती लाभणे फार कठीण आणि दुर्मिळ. कारण संत जरी खरा असला तरी त्याला ओळखणे कठीण असते, आणि पुष्कळदा त्याच्या बाह्य वागणुकीवरून मनात विकल्प येण्याचा संभव असतो; आणि एखाद्या भोंदूशीच गाठ पडली तर त्याच्या संगतीपासून नुकसान हे ठरलेलेच. म्हणून पहिला, म्हणजे संताच्या देहाच्या संगतीचा मार्ग, हा पुष्कळदा धोक्याचा ठरण्याचा संभव असतो. दुसऱ्या मार्गाने जाण्यात, म्हणजे त्याने सांगितलेले साधन करण्यात, बिलकूल धोका नसतो; कारण खरा संत काय किंवा भोंदू साधू काय, कोणीही झाला तरी तो दुसऱ्याला सांगताना खरे आणि बरोबर असेल तेच सांगेल. तो भोंदू असला तरी, आपला भोंदूपणा लपविण्याकरिता, जे बरोबर असेल तेच सांगणे त्याला जरूर असते. साधकाने शुद्ध भावनेने ते साधन केले की सत्संगतीचा फायदा मिळून त्याचे काम होते. खऱ्या संताच्या देहाच्या संगतीचा लाभ जर दैववशात् प्राप्त झाला तर मात्र काम बेमालूम होते. ज्या वाहनाचा आपण आश्रय करतो त्या वाहनाचा वेग हा आपला वेग होतो; फक्त त्या वाहनात निश्चल बसून राहणे एवढेच आपले काम असते. तसे आपण खऱ्या संताजवळ नुसते पडून राहावे. संताच्या संगतीत आपली कृती अशी काहीच नसते, नुसते अस्तित्व असते. त्यामुळे अहंकाराला वाव न राहून वासनेचा क्षय व्हायला फार मदत होते. तुकाराम महाराजांनी देवाजवळ धनसंपदा मागितली नाही, मुक्तिदेखील नको असे म्हटले, फक्त संतसंगती दे असे म्हटले. संतसंगाने नाम घेण्याची बुद्धी येते. बुद्धीची स्थिरता ठेवणे हे फक्त नामानेच साधेल. नाम जरूर तेवढे ठेवते आणि बाकीचे नष्ट करून टाकते. पण अनन्यभावाने नाम घ्यावे. नाम घेता घेता बुद्धीला स्थिरता येते; आणि मग मनात विकल्प न येता संतांच्या देहाच्या संगतीचा खरा फायदा घेता येतो. सत्संगतीत कष्टाशिवाय ईश्वरप्राप्ती होते. संतसंगतीत साधने आपोआप होत असतात. त्यांच्या पूजनाबरोबर पूजन, भजनाबरोबर भजन, श्रवणाबरोबर श्रवण, स्मरणाबरोबर स्मरण आपोआप होते. सत्संगतीत स्वतःची विस्मृती होते आणि नामस्मरण घडते. म्हणून प्रयत्नाने संतसंगती करावी. तिथे प्रारब्ध आणू नये. सत्संगतीत राहून नाम घेतले तर देहबुद्धीच्या कोंडीतून बाहेर पडता येते.

**बोधवचन:- संतांना जे आवडते ते आपल्याला आवडणे म्हणजे त्यांचा समागम करणे होय.**



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक

# मराठा आरक्षण अन् सामाजिक समतोल!

**महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाचा विषय गेल्या काही वर्षांपासून सामाजिक, राजकीय आणि न्यायिक पातळीवर प्रचंड गाजत आहे. मराठा समाजाने आरक्षणासाठी घेतलेली आक्रमक भूमिका, त्याचे ऐतिहासिक मागासलेपणाचे आधार, तसेच न्यायालयीन निर्णयांनी घडवलेली गुंतागुंत, या सगळ्या पार्श्वभूमीवर आज या विषयाकडे गंभीरतेने पाहण्याची गरज आहे.**




मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या मागासलेला वर्ग आजही मोठ्या प्रमाणावर दुर्लक्षित आहे. याच आधारावर राज्य सरकारने मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षण देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ५०% आरक्षण मर्यादा ओलांडल्यामुळे हे आरक्षण रद्द केले. यानंतरच हा विषय अधिकच पेटला.

या पार्श्वभूमीवर मनोज जारंगे पाटील यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यांनी मराठा आरक्षणाच्या लढ्याला नवे दिशा व बळ दिले. त्यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनांनी राज्य सरकारला व न्यायप्रणालीला गंभीर विचार करण्यास भाग पाडले. त्यांचा मुख्य मुद्दा म्हणजे — सर्व मराठ्यांना 'कुनबी' म्हणून ओळखून त्यांना ओबीसी आरक्षणात समाविष्ट करावे. जारंगे पाटील यांचे म्हणणे आहे की अनेक मराठा कुळांचे ऐतिहासिक पुरावे हे 'कुनबी' या वर्गाशी संबंधित आहेत आणि त्यामाध्यमातून मराठा समाजाला आरक्षण मिळणे हा केवळ सामाजिक न्यायाचा भाग आहे.

सरकारने 'कुनबी शोध प्रमाणपत्र' देण्याची प्रक्रिया सुरू करून या मागणीच्या दिशेने पावले टाकली आहेत. पण ही प्रक्रिया अजूनही संथ असून, अनेक तांत्रिक अडचणींमुळे सर्वसामान्य मराठ्यांपर्यंत लाभ पोहोचत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

### या प्रश्नावर तोडगा काढताना तीन गोष्टी अत्यावश्यक आहेत:

1. सामाजिक मागासलेपणाची निष्पक्ष व सखोल तपासणी
2. घटनात्मक व कायदेशीर चौकटीतच आरक्षणाची अंमलबजावणी
3. इतर मागासवर्गीयांवर अन्याय न करता सर्व समाजांमध्ये समतोल राखणे

मनोज जारंगे पाटील यांच्यासारख्या नेतृत्वाने मराठा समाजाच्या भावना आणि मागण्यांना एका सशक्त आंदोलनात परिवर्तित केले आहे. मात्र या आंदोलनाचे फलित हे केवळ भावना नव्हे, तर सुधारित धोरण, स्पष्ट कायदेशीर भूमिकेवर आधारित अंमलबजावणी असले पाहिजे. मराठा समाजाला न्याय मिळालाच पाहिजे, पण तो न्याय दीर्घकालीन, न्याय्य आणि सर्वसमावेशक असावा, ही काळाची गरज आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस यांची भूमिका...

मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षण देण्याचा प्रयत्न सर्वप्रथम गतीमानपणे झाला तो २०१८ मध्ये, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात. फडणवीस सरकारने 'महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग'ाची नेमणूक केली आणि आयोगाने मराठा समाजाच्या मागासलेपणाचा अहवाल सादर केल्यानंतर "महाराष्ट्र समाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (SEBC)" या नावे स्वतंत्र आरक्षण जाहीर करण्यात आले. या निर्णयामुळे मराठा समाजात आशेचा किरण निर्माण झाला होता.

देवेंद्र फडणवीस यांनी त्या वेळी घेतलेली भूमिका ही स्पष्ट आणि निर्णायक होती. त्यांनी आरक्षण दिल्यावरही विधानसभेत ठामपणे सांगितले होते की, "मराठा समाजाला आरक्षण हे त्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणावर आधारित देण्यात आले आहे आणि ते घटनात्मकदृष्ट्या वैध आहे." त्याचबरोबर इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाला धक्का न लावता हे स्वतंत्र आरक्षण देण्यात आल्याची त्यांनी वारंवार ग्वाही दिली.

मात्र, नंतर सर्वोच्च न्यायालयाने हे आरक्षण घटनाबाह्य ठरवत रद्द केले आणि प्रकरण पुन्हा सुरुवातीपासून तपासले जाऊ लागले. तरीही फडणवीस यांनी मराठा समाजासोबत असलेली आपली बांधिलकी अनेकदा स्पष्ट केली आहे. उपमुख्यमंत्रिपदावर असतानाही त्यांनी मराठा आरक्षणासाठी केंद्र सरकारशी चर्चा, कायदेशीर सल्लामसलत, आणि संभाव्य मार्ग काढण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले आहेत.

### सामाजिक समतोल राखणे हीच खरी कसोटी

मराठा समाजाला न्याय मिळालाच पाहिजे, हे निर्विवाद आहे. मात्र, हा न्याय तात्पुरत्या भावनिक दबावावर नव्हे तर टिकाऊ धोरण, पारदर्शक कायदे आणि सर्व समाजांच्या समतेवर आधारित असला पाहिजे. मराठा समाजाचे हक्क राखताना इतर मागासवर्गीयांचा हक्क न गमावता, राज्यात सामाजिक एकात्मता बळकट करणे हीच खरी राजकीय व प्रशासकीय कसोटी ठरेल.

### इतिहास आणि मागणीची पार्श्वभूमी

मराठा समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या शेतकरी आणि जमीनदार म्हणून ओळखला जातो, मात्र त्यातील मोठा वर्ग आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेलाच राहिला आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन मराठा समाजाने स्वतंत्र आरक्षणाची मागणी केली. २०१८ मध्ये फडणवीस सरकारने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या शिफारशींनुसार "महाराष्ट्र सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (SEBC)" या नावाने आरक्षण मंजूर केले. परंतु सर्वोच्च न्यायालयाने ५०% आरक्षण मर्यादा ओलांडल्याचे कारण देत हे आरक्षण रद्द केले आणि त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया पुन्हा सुरुवातीपासून सुरू करण्याची वेळ आली.

### मनोज जारंगे पाटील यांची भूमिका: लढ्याला नवा आयाम

मराठा आरक्षणाच्या मागणीला नवे बळ मिळाले ते मनोज जारंगे पाटील यांच्या नेतृत्वातून. त्यांनी राज्यभर धरणे, आंदोलन, पदयात्रा आयोजित करत मराठा समाजाचा आवाज बुलंद केला. त्यांचा मुख्य मुद्दा — सर्व मराठ्यांना 'कुनबी' म्हणून ओळखून ओबीसी आरक्षणात समाविष्ट करणे. जारंगे पाटील यांचा दावा आहे की, ऐतिहासिक दस्तऐवज आणि नोंदींनुसार अनेक मराठा कुळांचे 'कुनबी'शी घनिष्ठ नाते आहे आणि त्यामुळे त्यांना ओबीसी प्रवर्गातील फायदे मिळणे हा सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक: MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**मराठा आंदोलन** गावोगावी बैठकांचे सत्र, महिलाही दाखल होण्याची शक्यता

# मराठा आंदोलनाची व्याप्ती तीव्र?

## सरकारवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईत आलेल्या मराठा आंदोलकांची सरकारकडून कोंडी केली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारपासून आंदोलनाची व्याप्ती वाढविण्याची तयारी मराठा क्रांती मोर्चाने सुरू केली आहे. त्याचच एक भाग म्हणून ग्रामीण भागात गावोगावी बैठका सुरू झाल्या असून येत्या काही दिवसांत महिलांना मोठ्या संख्येने आंदोलनात उतरविण्याची तयारी मराठा समाजाने सुरू केल्याचे सांगितले जात आहे.**



मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवारपासून आझाद मैदानात बेमुदत उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी आंदोलकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागल्याने सरकारकडूनच आंदोलकांची कोंडी केली जात असल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला. त्यानंतर महापालिकेने तातडीने हालचाल करीत आंदोलनस्थळी लाइट, पाणी, शौचालयांची व्यवस्था केली. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार पोलीस आणि पालिका यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे आंदोलकांना गैरसोयींचा सामना करावा लागला.पोलिसांनी आंदोलनाला एक दिवसाची परवानगी देताना पाच हजार लोक जमा होतील, त्यासाठी व्यवस्था करण्याची सूचना पालिकेला केली होती. त्यानुसार महापालिकेने सुमारे दहा ते १५ हजार जमाव गृहीत धरून एक दिवसाची व्यवस्था केली होती. प्रत्यक्षात ३० ते ३५ हजारचा जमाव आल्याने आझाद मैदानातील व्यवस्था कोलमडून पडली.

मात्र राज्य सरकारच्या आदेशानंतर रात्री काही प्रमाणात तर सकाळी मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या सूचनेनुसार महापालिकेकडून आंदोलनस्थळी मूलभूत सोयीसुविधा उभारण्यात आल्यानंतर मराठा समाजाच्या आंदोलकांनी समाधान व्यक्त केले असले तरी अजूनही या सुविधा अपुऱ्या असल्याची तक्रार मराठा क्रांती मोर्चाने केली आहे. गैरसोयींमुळे आंदोलक जास्त दिवस मुंबईत थांबणार नाहीत.

दोन-तीन दिवसांमध्ये आपल्या गावी परततील आणि त्यानंतर आंदोलनाची तीव्रता कमी होईल अशी सरकारची अपेक्षा असून त्या दृष्टीने जरांगे पाटील यांच्याशी चर्चा लांबवली जात असल्याचे सांगितले जात आहे. म्हणूनच आंदोलनाची व्याप्ती वाढवून सरकारवर दबाव वाढविण्याचा आमचा प्रयत्न असेल असे आयोजकांकडून सांगण्यात आले. – मुंबईत समाजबांधवांची सरकारकडून कोंडी केली जात असून आंदोलन मोडण्याचे प्रयत्न सुरू झाल्याचे संदेश गावोगावी पाठविले पोहोचविले जात आहेत. गेले दोन दिवस आंदोलकांच्या होणाऱ्या अडवणुकीमुळे ग्रामीण भागात नाराजी पसरली असून सोमवारपासून मुंबईत येणाऱ्या आंदोलकांची संख्या वाढेल.

मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवारपासून आझाद मैदानात बेमुदत उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी आंदोलकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागल्याने सरकारकडूनच आंदोलकांची कोंडी केली जात असल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला.

त्यानंतर महापालिकेने तातडीने हालचाल करीत आंदोलनस्थळी लाइट, पाणी, शौचालयांची व्यवस्था केली. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार पोलीस आणि पालिका यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे आंदोलकांना गैरसोयींचा सामना करावा लागला.पोलिसांनी आंदोलनाला एक दिवसाची परवानगी देताना पाच हजार लोक जमा होतील, त्यासाठी व्यवस्था करण्याची सूचना पालिकेला केली होती.

### अजूनही अपुऱ्या सुविधा

मात्र राज्य सरकारच्या आदेशानंतर रात्री काही प्रमाणात तर सकाळी मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या सूचनेनुसार महापालिकेकडून आंदोलनस्थळी मूलभूत सोयीसुविधा उभारण्यात आल्यानंतर मराठा समाजाच्या आंदोलकांनी समाधान व्यक्त केले असले तरी अजूनही या सुविधा अपुऱ्या असल्याची तक्रार मराठा क्रांती मोर्चाने केली आहे.

# शिंदेंनी जरांगेंना खोटं आश्वासन दिलं?

## शिंदे यांनी जरांगेंची फसवणूक केल्याची चर्चा रंगू लागली

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या काही वर्षापासून मराठा आरक्षणासाठी लढणारे, मराठा समाजाला आरक्षण मिळावं ही मागणी घेऊन सातत्याने आंदोलनं व उपोषणं करणारे मनोज जरांगे पाटील हे त्यांची मागणी घेऊन आता मुंबईत दाखल झाले आहेत. जरांगे हे शुक्रवारपासून (२९ ऑगस्ट) मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसले आहेत.**



मनोज जरांगे पाटील याआधी देखील मराठा मोर्चा घेऊन मुंबईत धडकले होते. परंतु, त्यांचा मोर्चा मुंबईच्या वेशीवर नवी मुंबईतील वाशी येथे पोहोचल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने जरांगे व त्यांच्या सहकाऱ्यांशी बातचीत करून मराठा आरक्षणप्रश्नी तात्पुरता तोडगा काढला होता.

एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेऊन, हाती गुलाल घेत मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवण्याचं आश्वासन दिल्यावर मराठा आंदोलक माघारी फिरले. मात्र, मराठा आंदोलकांच्या मागण्या पूर्ण न झाल्याने मनोज जरांगे पुन्हा एकदा मुंबईत धडकले आहेत. या आंदोलनावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया

येऊ लागल्या आहेत. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी काही वेळापूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याशी बातचीत केली. मराठा आंदोलनावर त्यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, राज ठाकरे म्हणाले, “तुमच्या व लोकांच्या मनात जे प्रश्न आहेत त्या प्रश्नांची उत्तरं केवळ एकच माणूस देऊ शकतो. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देऊ शकतात.”

### ठाकरेंचं एकनाथ शिंदेंकडे बोट

राज ठाकरे म्हणाले तुम्ही (माध्यम) म्हणताय तसा लोकांना त्रास होतोय वगैरे गोष्टींवर केवळ एकनाथ शिंदे बोलू शकतात. कारण मागील वेळेस एकनाथ शिंदे हेच नवी मुंबईला गेले होते ना? त्यांनी नवी मुंबईत जाऊन मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवला असं सांगितलं जात होतं. मग मराठा आंदोलक परत का आले याचं उत्तरं फक्त एकनाथ शिंदे देऊ शकतात.”

पेन्शनसाठी

## ७ वर्षांनंतर पहिलाच चीन दौरा; मोठा निर्णय होणार?

# पंतप्रधान मोदी चीनमध्ये दाखल!

## व्लादिमिर पुतिन देखील उपस्थित






। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर टॅरिफ लादलं आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे अनेक देशांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. भारतावरही अमेरिकेकडून लावण्यात येणारे एकूण आयातशुल्क ५० टक्के झालं आहे. ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफमुळे (आयात शुल्क) भारताला अमेरिकेत वस्तू निर्यात करण्यासाठी ५० टक्के आयात शुल्क भरावा लागत आहे. टॅरिफच्या मुद्यावरून भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये काहीसा तणाव निर्माण झाला आहे.**

टॅरिफच्या मुद्यावरून भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला असतानाच दुसरीकडे चीन-आणि भारतामधील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचं पाहायला मिळत आहे. तब्बल ७ वर्षांनंतर पंतप्रधान मोदी चीनच्या तिआंजिनमध्ये दाखल झाले आहेत. शांघाय सहकार्य संघटनेची ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी चीनमधील तिआंजिनमध्ये बैठक होणार असून या बैठकीत पंतप्रधान मोदी सहभागी होणार आहेत. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.शांघाय सहकार्य संघटनेची (SHANGHAI COOPERATION ORGANISATION) आतापर्यंतची ही सर्वात मोठी बैठक असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे देखील उपस्थित असणार आहेत. त्यामुळे या बैठकीकडे अवघ्या जगाचं लक्ष लागलेलं आहे. ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या अतिरिक्त टॅरिफ दरम्यान भारतासाठी पंतप्रधान मोदींचा हा चीन दौरा महत्वाचा ठरण्याची शक्यता आहे. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग व रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्यात बैठक होण्याची शक्यता आहे. या बैठकीत अनेक महत्वाचे मोठे निर्णय होण्याची शक्यता आहे. शांघाय सहकार्य संघटनेची बैठक ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी चीनमधील तिआंजिन येथे होणार असून, या संघटनेची आतापर्यंतची ही सर्वांत मोठी बैठक आहे. पंतप्रधान मोदी यांच्यासह रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे देखील या बैठकीला उपस्थित असतील. तुर्कीचे अध्यक्ष रिसेप तय्यीप अर्दोगन, इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबिआंतो, मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम, व्हिएतनामचे पंतप्रधान फाम मिन चिन्ह, पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ, नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली, मालदीवचे अध्यक्ष महंमद मुईझ्झू यांच्यासह इतर महत्त्वाचे नेते बैठकीला उपस्थित राहतील.शांघाय सहकार्य संघटनेत रशिया, भारत, इराण, कझाकस्तान, किरगिस्तान, पाकिस्तान, ताजिकिस्तान, उझबेकिस्तान, बेलारूस, चीन या देशांचा समावेश आहे. संघटनेच्या बैठकीला उपस्थित असणारे अनेक नेते ३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या विजय दिनानिमित्त संचलनाताही उपस्थित राहणार आहेत.टॅरिफच्या मुद्यावरून भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला असतानाच दुसरीकडे चीन-आणि भारतामधील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचं पाहायला मिळत आहे. तब्बल ७ वर्षांनंतर पंतप्रधान मोदी चीनच्या तिआंजिनमध्ये दाखल झाले आहेत. शांघाय सहकार्य संघटनेची ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी चीनमधील तिआंजिनमध्ये बैठक होणार असून या बैठकीत पंतप्रधान मोदी सहभागी होणार आहेत. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.शांघाय सहकार्य संघटनेचीआतापर्यंतची ही सर्वात मोठी बैठक असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे देखील उपस्थित असणार आहेत. त्यामुळे या बैठकीकडे अवघ्या जगाचं लक्ष लागलेलं आहे.

### आतापर्यंतची सर्वांत मोठी बैठक

भारतासाठी पंतप्रधान मोदींचा हा चीन दौरा महत्वाचा ठरण्याची शक्यता आहे. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग व रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्यात बैठक होण्याची शक्यता आहे.शांघाय सहकार्य संघटनेची बैठक ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी चीनमधीलहोणार असून, या संघटनेची आतापर्यंतची ही सर्वांत मोठी बैठक आहे.

## अमेरिकन ब्रँड टॉयलेटमध्ये दिसत आहे

## अमेरिकन सुरक्षा सल्लागार टॅरिफवरून ट्रम्प यांच्यावर संतापले



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात टॅरिफ लादलं आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे जगातील अनेक देशांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. काही दिवसांपूर्वी भारतावरही २५ टक्के टॅरिफ लादलं, तसेच ६ ऑगस्ट रोजी भारतावर आणखी २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादलं.**

भारतावरील अतिरिक्त टॅरिफ २७ ऑगस्टपासून लागू झालं असून आता अमेरिकेकडून भारतावर लावण्यात येणारे एकूण आयातशुल्क ५० टक्के झालं आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफमुळे (आयात शुल्क) भारताला अमेरिकेत वस्तू निर्यात करण्यासाठी ५० टक्के टॅरिफ भरावा लागत आहे. याचा भारतातील अनेक क्षेत्रांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. टॅरिफच्या मुद्यावरून भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये काहीसा तणाव निर्माण झाला आहे. मात्र, असं असतानाच दुसरीकडे भारत आणि चीनमधील संबंध सुधारत असल्याची परिस्थिती दिसत आहे.तब्बल सात वर्षांनंतर पंतप्रधान मोदी चीनच्या दौऱ्यावर जाणार असून ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या अतिरिक्त टॅरिफ चीनची विश्वासार्हता वाढत आहे आणि आपला अमेरिकन ब्रँड टॉयलेटमध्ये दिसत आहे.

असं जेक सुलिव्हन यांनी म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारताबाबतच्या व्यापार धोरणावर तीव्र हल्ला चढवला. जेक सुलिव्हन यांनी असा इशारा दिला की वाढत्या शुल्कामुळे अमेरिकेची जागतिक स्थिती बिघडत आहे व भारत आणि चीन जवळ येत आहेत.

### शुल्काबाबतच्या धोरणामुळे संबंध

ट्रम्प यांच्या शुल्काबाबतच्या धोरणामुळे संबंध ताणले गेले आहेत. ज्यामुळे भारत-चीन जवळ येत आहेत, असं जेक सुलिव्हन यांनी म्हटलं.ट्रम्प यांच्या शुल्काबाबतच्या धोरणाच्या परिणामामुळे वर्षानुवर्षे अमेरिकेच्या हितसंबंधांना हानी पोहोचू शकते. हा असा देश आहे ज्याच्याशी आपण अधिक शाश्वत संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करत होतो.

# ॥ गौरी आवाहन ते गौरी विसर्जन ॥

**गणपती बसल्यानंतर दुसऱ्या दिवशी ऋषीपंचमी आणि यानंतर होते ते गौरी आवाहन. गौरी पूजन हे देखील भाद्रपद महिन्यातील महत्वाचे व्रत आहे. ज्येष्ठा गौरीचे प्रत्येकाकडे आपआपल्या परंपरेप्रमाणे पूजन होते. गौरी आवाहन ते गौरी विसर्जन यादरम्यान काय काय केले जाते. याची माहिती खास महाईन्यूजच्या वाचकांसाठी...**

अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया भाद्रपद महिन्याच्या शुद्ध पक्षात गौरींचे पूजन करतात. एका पौराणिक कथेनुसार, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया आपले सौभाग्य अक्षय करण्यासाठी गौरीला शरण गेल्या. तिची प्रार्थना केली. गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार केला. तेव्हापासून अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात. गौरी किंवा महालक्ष्मीचे पूजन ज्येष्ठ नक्षत्रावर केले जाते, म्हणून यांना ज्येष्ठागौरी असेही संबोधले जाते.

## गौरी आवाहन

पहिला दिवस गौरी आवाहनाचा असतो. आपापल्या पद्धत आणि परंपरेप्रमाणे घरातील प्रवेशद्वारापासून ते गौरी स्थापन करण्याच्या जागेपर्यंत रांगोळीने लक्ष्मीच्या पावलांचे ठसे काढावेत. हातात गौरी घेऊन आलेल्या बाईचे पाय दुधाने व पाण्याने धुवावे आणि त्यावर कुंकवाचे स्वस्तिक काढावे. आता येताना लक्ष्मीच्या पायांचे ठसे उमटवत उमटवत गौरींचे मुखवटे आणावेत. गौरी आगमन करत असताना ताट चमच्याने किंवा घंटेने वाजत गाजत गौरीचे स्वागत करावे. गौरीची स्थापना करण्यापूर्वी त्यांना घरातील समृद्धी, दूध-दुभत्याची जागा अशा गोष्टी दाखवाव्यात. आशीर्वाद मिळून ऐश्वर्य नांदो, अशी प्रार्थना करावी. अशा या प्रथेला गौरी आवाहन करणे, असे संबोधतात.

## गौरी पूजन

दुपारी १२ वाजेपर्यंत गौरीला नैवेद्य दाखवावा. या दिवशी काही सगेसोयरीक जेवणाला सांगितले जातात. गौरी पूजन आणि आरती करतात तसेच जेवायला पुरणपोळी, ज्वारीच्या पिठाची आंबील, अंबाडीची भाजी, सोळा भाज्यांची एकत्र भाजी, दिवेफळ वगैरे पदार्थांचा नैवेद्यात समावेश असतो. नैवेद्यात शेंगदाणा आणि डाळीची चटणी, पंचामृत, पडवळ घालून केलेली ताकाची कढी, कटाची आमटी, वेगवेगळ्या प्रकारची भजी, पापड, लोणचे इत्यादी करतात.

## गौरी विसर्जन

तिसरा दिवस म्हणजे गौरी विसर्जनाचा असतो. यादिवशी सकाळी पोवत्याच्या/सुताच्या गाठी पाडतात. त्या सुतात हळदीकुंकू, सुकामेवा, बेलफळ, फुले, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल, रेशमी धागा असे एक एक जिन्नस घालून गाठी पाडतात. यांमध्ये हळदीकुंकू, रेशमी सूत, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल हे महत्त्वाच्या वस्तू असतात. नंतर गौरींची/ महालक्ष्मींची पूजा आणि आरती करतात. गोड शेवयाची खीर, उडीद डाळीचा भाजलेला पापड याचा नैवेद्य दाखवतात. या तिसऱ्या दिवशी गौरींच्या/ महालक्ष्मींच्या चेहऱ्यावर एक प्रकारची उदासीनता दिसून येते. गौरींची पूजा, आरती करून पुढील वर्षी येण्याचे आमंत्रण देऊन त्यांचा निरोप घेतला जातो, आणि त्यांचे विसर्जन केले जाते. (धातूच्या किंवा कायम स्वरूपाच्या मूर्ती असतील तर त्यांचे विसर्जन करत नाहीत.) गौरींचे पाण्यात विसर्जन केल्यावर परत येताना थोडी वाळू घरी आणून ती सर्व घरभर व परसातल्या झाडांवर टाकतात. त्यायोगे घरात समृद्धी नांदते व झाडाझुडुपांचे कीटकांपासून संरक्षण होते अशी समजूत आहे. सकाळी ९ ते दुपारी २ वाजून ५६ मिनिटापर्यंत ज्येष्ठा गौरीचे विसर्जन करावे.







## गौरी आवाहन

गौरींचे आगमन हे नक्षत्रानुसार होते. अनुराधा नक्षत्रामध्ये गौरींचे आगमन होते आणि मूळ नक्षत्रात त्यांचे विसर्जन केले जाते. पहिल्या दिवशी तुळशीपासून पावला-पावलांनी डोक्यावरून गौरींना घरात आणले जाते. यावेळी "गौरी आली, सोन्याच्या पावली...गौरी आली, चांदीच्या पावली... गौरी आली, गाई वासराच्या पावली...गौरी आली, पुत्र-पौत्रांच्या पावली..." असे म्हणत गौरींचे माहेरवाशीणीसारखे स्वागत केले जाते. त्यांना नवीन साड्या आणि दागदागिने घालून सजवले जाते.

## गौरी पूजन

दुसऱ्या दिवशी, जेष्ठा नक्षत्रावर गौरींचे पूजन केले जाते आणि गोडधोडाचे जेवण केले जाते. यामध्ये १६ भाज्या, ५ कोशिंबिरी, पुरणाचा स्वयंपाक असे पंचपक्वान्न केले जातात. या दिवशी सवाष्ण आणि ब्राह्मणांना जेवायला बोलावले जाते. तसेच गौरींना लाडू, चिवडा, करंज्या असे फराळाचे पदार्थ, मिठाई, फळे यांचाही नैवद्य दाखविला जातो. तसेच गौरीला विविध प्रकारची फुले आणि पत्री वाहिली जातात. सायंकाळी विवाहित स्त्रियांना हळदी-कुंकवासाठी बोलावले जाते. तसेच कुटुंबातील सदस्य, नातेवाईकाना आणि मित्र-मैत्रिणींना गौरीच्या दर्शनासाठी घरी बोलावतात.

## ओवसा

अनेक ठिकाणी गौरी पूजनाच्या दिवशी ओवसा भरण्याची पद्धत असते. ओवसा म्हणजे गौरीला ओवाळणे किंवा ओवसणे , ज्याला ववसा असेही म्हटले जाते. या परंपरेद्वारे घरातील सुनेला मानसन्मान दिला जातो. त्यांना त्यांच्या आवडीच्या भेटवस्तू अथवा पैसेही दिले.

## गौरी विसर्जन

तिसऱ्या दिवशी मूळ नक्षत्रावर गौरींचे विसर्जन केले जाते. काही जणांकडे गौरीसह गणरायाचे विसर्जन केले जाते, तर काही जणांकडे विसर्जन झाल्यानंतर १० दिवसांनीच गणपतीचे विसर्जन होते.

## ज्येष्ठ गौरी आवाहनाचे महत्त्व

या दिवशी माता गौरी म्हणजे माता पार्वती आणि गणेशाची पूजा केली जाते. गणेश चतुर्थीच्या दोन दिवसांनी माता पार्वती कैलास पर्वतावरून धरतीवर अवतरित झाली होती, असे मानले जाते. गणरायाप्रमाणेच गौरींचेदेखील उत्साहत स्वागत होते. यावेळी फुलांनी आणि कलाकुसरीच्या वस्तूंनी सजावट केली जाते. बाजारात सुंदर आणि सुबक असे गौरीचे मुखवटे मिळतात. यामध्ये शाडू, पितळे, कापडी, फायबरचे असे काही प्रकार पाहायला मळातात. काही जण केवळ मुखवट्यांची पूजा करतात, तर काही जणांकडे उभ्या गौरी असतात. कोकणात काही ठिकाणी खुर्चीवर बसलेली गौरी पाहायला मिळते. तसेच समुद्र किंवा नदीतील खडा आणून पूजण्याची रितही असते. काही ठिकाणी तांब्यावर चेहरा रेखाटून गौरी पूजन केले जाते. प्रत्येक कुटुंबात आपआपल्या पद्धतीनुसार गौरी बसविल्या जातात. मनोभावे गौरींची स्थापना करून त्यांचे पूजन केले जाते. महाराष्ट्रात या सणाला महालक्ष्मी पूजन असेही म्हटले जाते.

## राजस्थानला मोठा धक्का

## राहुल द्रविड मुख्य प्रशिक्षकपदावरून पायउतार

# राजस्थान रॉयल्सला मोठा धक्का!

## एकाच वर्षात संघाची साथ सोडली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल २०२६ स्पर्धेआधी राजस्थान रॉयल्स संघाची जोरदार चर्चा सुरू आहे. काही दिवसांपासून संघाचा कर्णधार संजू सॅमसन संघाची साथ सोडून चेन्नई सुपर किंग्जकडे जाणार असल्याची चर्चा रंगली होती. मात्र, आता राजस्थान रॉयल्स संघाला सर्वात मोठा धक्का बसला आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी संघाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर राहुल द्रविड यांनी राजस्थान रॉयल्स संघाच्या मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी स्वीकारली होती. पण एकाच वर्षात त्यांनी या संघाची साथ सोडली आहे.**



राहुल द्रविड यांनी याआधी देखील राजस्थान रॉयल्स संघाच्या मुख्य प्रशिक्षकाची भूमिका पार पाडली होती. २०२४ मध्ये ते पुन्हा एकदा या पदावर परतले होते. मात्र या हंगामात राजस्थान रॉयल्स संघाला हवी तशी कामगिरी करता आली नव्हती. संजू सॅमसन देखील काही सामने दुखापतीमुळे संघाबाहेर होता. त्यामुळे संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी रियान परागकडे सोपवण्यात आली होती. मात्र, राजस्थानचा संघ गुणतालिकेत ९ व्या स्थानी होता. आता राजस्थान रॉयल्सने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत राहुल द्रविड यांचे आभार मानले आहेत. या पोस्टला कॅप्शन देत त्यांनी लिहिले की, "गुलाबी जर्सीत तुम्ही नेहमीच युवा आणि अनुभवी खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरले."राहुल द्रविड यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने २०२४ मध्ये आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपदाचा मान मिळवला होता. या स्पर्धेनंतर त्यांचा मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ संपला होता. ६ सप्टेंबर २०२४ ला राजस्थान रॉयल्सने त्यांची संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली होती. युवा खेळाडूंना घडवण्यात राहुल द्रविड यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी याआधी भारतीय १९ वर्षांखालील संघाला देखील प्रशिक्षण दिलं आहे.राजस्थान रॉयल्सने राहुल द्रविडसाठी खास पोस्ट शेअर केली आहे.

या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की,"राहुल द्रविड हे गेल्या कित्येक वर्षांपासून रॉयल्सच्या प्रवासाचे केंद्रबिंदू राहिले आहेत. त्यांच्या नेतृत्वाने एका संपूर्ण पिढीला दिशा देण्याचं काम केलं आहे. द्रविड यांना मोठ्या पदाची ऑफर देण्यात आली होती. मात्र, त्यांनी ती ऑफर नम्रपणे नाकारली. त्यांनी संघासाठी दिलेल्या योगदानाबद्दल फ्रेंचायझी, खेळाडू आणि चाहत्यांनी त्यांचे आभार मानले आहेत."

आगामी हंगामासाठी राजस्थान रॉयल्स संघ नव्या मुख्य प्रशिक्षकाची नियुक्ती करू शकतो. राहुल द्रविड यांनी याआधी देखील राजस्थान रॉयल्स संघाच्या मुख्य प्रशिक्षकाची भूमिका पार पाडली होती. २०२४ मध्ये ते पुन्हा एकदा या पदावर परतले होते. मात्र या हंगामात राजस्थान रॉयल्स संघाला हवी तशी कामगिरी करता आली नव्हती. संजू सॅमसन देखील काही सामने दुखापतीमुळे संघाबाहेर होता. त्यामुळे संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी रियान परागकडे सोपवण्यात आली होती. मात्र, राजस्थानचा संघ गुणतालिकेत ९ व्या स्थानी होता. आता राजस्थान रॉयल्सने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत राहुल द्रविड यांचे आभार मानले आहेत.

या पोस्टला कॅप्शन देत त्यांनी लिहिले की, "गुलाबी जर्सीत तुम्ही नेहमीच युवा आणि अनुभवी खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरले."राहुल द्रविड यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने २०२४ मध्ये आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपदाचा मान मिळवला होता. या स्पर्धेनंतर त्यांचा मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ संपला होता. ६ सप्टेंबर २०२४ ला राजस्थान रॉयल्सने त्यांची संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली होती.

### संपूर्ण पिढीला दिशा देण्याचं काम

युवा खेळाडूंना घडवण्यात राहुल द्रविड यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी याआधी भारतीय १९ वर्षांखालील संघाला देखील प्रशिक्षण दिलं आहे.राजस्थान रॉयल्सने राहुल द्रविडसाठी खास पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की," राहुल द्रविड हे गेल्या कित्येक वर्षांपासून रॉयल्सच्या प्रवासाचे केंद्रबिंदू राहिले आहेत. त्यांच्या नेतृत्वाने एका संपूर्ण पिढीला दिशा देण्याचं काम केलं आहे.

# कायरन पोलार्डची इतिहासाला गवसणी!

## ख्रिस गेलचा मोठा विक्रम मोडण्यासाठी इतक्या धावांची गरज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वेस्टइंडिजचा माजी फलंदाज कायरन पोलार्ड हा कॅरेबियन प्रीमियर लीग स्पर्धेत ट्रिनबागो नाईट रायडर्स संघाचं प्रतिनिधित्व करत आहे. वयाच्या ३८ व्या वर्षीही त्याच्या फलंदाजीतील धार कमी झालेली नाही. त्याच्या दमदार फलंदाजीच्या बळावर ट्रिनबागो नाईट रायडर्स संघाने ७ गडी राखून दमदार विजयाची नोंद केली.**




या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या बारबाडोस रॉयल्स संघातील फलंदाजांनी २० षटकांअखेर १७८ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना ट्रिनबागो नाईट रायडर्स संघाकडून निकोलस पूरन आणि कॉलिन मुनरो यांनी अर्धशतकं झळकावली आणि आपल्या संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. यादरम्यान कायरन पोलार्डने टी-२० क्रिकेटमधील मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.पोलार्डने ट्रिनबागो नाईट रायडर्स संघाकडून फलंदाजी करताना ९ चेंडूत १९ धावा चोपल्या. या खेळीदरम्यान त्याने २ चौकार आणि १ षटकार मारला. या सामन्यात फलंदाजीला येण्यापूर्वी त्याला टी-२० क्रिकेटमध्ये १४००० धावांचा पल्ला गाठण्यासाठी अवघ्या १९ धावांची गरज होती. या धावा करताच तो टी-२० क्रिकेटच्या इतिहासात १४००० धावांचा पल्ला गाठणारा दुसराच फलंदाज ठरला आहे. या यादीत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत माजी फलंदाज ख्रिस गेल अव्वल स्थानी आहे. गेलच्या नावे १४५६२ धावा केल्या आहेत. त्यामुळे आता पोलार्डला टी-२० क्रिकेटमध्ये सर्वोच्च धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी पोहोचायचं असेल, तर त्याला आणखी ५६२ धावा कराव्या लागणार आहेत.

### ६५ धावांची तुफानी खेळी

जगभरातील टी-२० लीग स्पर्धांमध्ये धावांचा पाऊस पाडणारा पोलार्ड कॅरेबियन प्रीमियर लीग स्पर्धेतही दमदार फलंदाजी करत आहे. त्याने या स्पर्धेत सेंट लुसिया किंग्ज संघाविरूद्ध फलंदाजी करताना अर्धशतकी खेळी केली होती. या सामन्यात ६५ धावांची तुफानी खेळी करत त्याने संघाच्या विजयात मोलाचं योगदान दिलं होतं.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। रविवार ।
। दि. 31 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


### 30 कोटींहून अधिक मिळकत कराची थकबाकी

# अनधिकृत मोबाइल टॉवरकडे डोळेझाक!

## पिंपरी-चिंचवडमध्ये 390 अनधिकृत मोबाइल टॉवर; 15 टक्केदेखील कर वसुली नाही

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरातील मोक्याच्या अनेक ठिकाणी, निवासी आणि बिगर निवासी मोठ्या इमारतींच्या गच्चीवर विविध कंपन्यांनी मोबाइल टॉवर उभारले आहेत. या मोबाइल टॉवर कंपन्यांकडे करोडो रुपयांचा मालमत्ता कर थकीत आहे. त्या थकबाकी वसुलीकडे महापालिकेचा कर आकारणी व कर संकलन विभाग वर्षानुवर्षे दुर्लक्ष करत आहे. या कंपन्यांकडे ३० कोटींहून अधिक मिळकत कराची थकबाकी आहे.**





राज्य शासनाने मोबाइल टॉवर कंपन्यांकडे सामान्य कराच्या १५ टक्क्यांनुसार कर वसुली करण्याचे आदेश दिलेले आहेत. तरीही त्याकडे करसंकलन विभागाकडून कोणीच लक्ष देत नाही. सामान्य नागरिकांना ५० हजार रुपयांसाठी घराच्या जप्तीचे आदेश काढणाऱ्या महापालिकेकडून मोबाइल टॉवर्सच्या उद्योगपतींच्या कंपन्यांवर कृपादृष्टी का दाखवत आहेत, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. अनधिकृत मोबाईल टॉवरवर प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी होत आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक ठिकाणी, टोलेजंग इमारतींच्या गच्चीवर मोबाइल टॉवर उभारले आहे. मात्र, शहरातील विविध इमारतींवर उभारण्यात आलेल्या एकूण ९२३ मोबाइल टॉवरपैकी ५३३ मोबाइल टॉवर अधिकृत आहेत, तर ३९० टॉवरधारक मोबाइल कंपन्यांनी महापालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही.

### हौसिंग सोसाट्यांचा मोबाइल टॉवरला विरोध

ग्रामीण भागातील अनेक हौसिंग सोसायट्यांचा मोबाईल टॉवर उभारण्यास विरोध आहे. तसेच अनधिकृतपणे टॉवर काढून टाकावेत, अशी मागणी होत आहे. ग्रामीण भागामध्येही मोठ्या प्रमाणात टॉवर उभारण्यात आले आहेत. परंतु त्या कंपनीनेही ग्रामपंचायतीचा करा थकवला आहे. तसेच अनधिकृत टॉवरवर प्रशासनाकडून कारवाई केली जात नाही, असा नागरिकांचा आरोप आहे.

### ३९० अनधिकृत टॉवर

पिंपरी - चिंचवड महापालिकेच्या रेकॉर्डवर शहरात २२३ मोबाइल टॉवर आहेत. त्यात ५३३ टॉवर अधिकृत, तर ३९० टॉवर अनधिकृतपणे उभे आहेत. अनधिकृत टॉवरकडे महापालिकेने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून केवळ एक - दोन मोबाइल टॉवर कंपन्यांनी स्वतःहून मालमत्ता कर भरला आहे. उर्वरित अधिकृत आणि अनधिकृत असलेल्या मोबाइल टॉवर्सच्या कंपन्यांनी मिळकत कर थकविला आहे. मोबाइल टॉवर उभारताना अनेक अनधिकृत इमारतींवरही अनधिकृत टॉवर असून, अशा प्रकारचे टॉवर अधिकृत होणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. काही मोठ्या हाउसिंग सोसायट्यांनीही अनधिकृतपणे टॉवर उभारले आहेत. दोन वर्षांपूर्वी असे अनधिकृत टॉवर महापालिकेच्या करसंकलन कार्यालयाकडून सील केले होते. मात्र, मोबाइल कंपन्यांनी न्यायालयातून याला स्थगिती आणली होती.

---

# ‘मॅथलेटिक्स’ स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## शिक्षण विश्वः एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी येथील उपक्रम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी येथील गणित विभागाच्या वतीने ‘मॅथलेटिक्स – पॉवर युअर ब्रेन’ या दोन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील विविध ११ महाविद्यालयांमधून एकूण ३२० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.**




स्पर्धेच्या विविध स्पर्धात्मक उपक्रमांत पोस्टर प्रेझेंटेशन, पीपीटी प्रेझेंटेशन, प्रश्नमंजुषा, मॅथ कोडिंग, मॅथ पझल्स आणि बुद्धिबळ यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी त्यांच्या तर्कशक्ती, ज्ञान आणि सादरीकरण कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. विशेषतः मॅथ कोडिंग आणि पझल्स या विभागांतून विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची आणि समस्यांचा सुसंस्कृत तोडगा काढण्याच्या क्षमतेची उत्तम उदाहरणे दिली. स्पर्धेचे उद्घाटन ज्ञान होरायझन इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक संतोष रंजन, एस.बी.आय. आळंदी शाखेचे मुख्य व्यवस्थापक पी. के. झा, , तसेच उपसंचालक डॉ. मानसी अतीतकर यांची उपस्थिती होती. तसेच, बक्षीस वितरण समारंभात संचालक डॉ. बी. बी. वाफारे आणि प्रमुख पाहुणे रिलायन्स जिओचे सहाय्यक उपाध्यक्ष डॉ. मुनिर सय्यद यांच्या हस्ते विजेत्यांना रोख रक्कम, ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेताना मिळालेल्या ज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका मानली.

## प्रवास होणार अधिक सुलभ आणि सुरक्षित

# चिंचवड रेल्वे स्थानकाजवळील जुना उड्डाणपूल पाडून नवीन बांधणार!

### तज्ज्ञांच्या स्ट्रक्चरल ऑडिट अहवालांवर आणि रेल्वे विभागाच्या मंजुरीनंतर घेण्यात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड महापालिकेने चिंचवड रेल्वे स्थानकाजवळील जुना रेल्वे उड्डाणपूल (आरओबी) पाडून त्याऐवजी नवीन उड्डाणपूल बांधण्यास मान्यता दिली आहे. तज्ज्ञांच्या स्ट्रक्चरल ऑडिट अहवालांवर आणि रेल्वे विभागाच्या मंजुरीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. येथे जुना पूल पाडून नवीन पूल उभारल्याने येथील प्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित होणार आहे..**

मुंबई-पुणे महामार्गावर महावीर चौकातून चिंचवड गावाकडे जाणारा डाव्या बाजूचा रेल्वे उड्डाणपूल १९७६ मध्ये बांधण्यात आला होता. या पुलाच्या उजव्या बाजूला समांतर उड्डाणपूल २००४ मध्ये बांधण्यात आला आहे. तर, १९७६ मध्ये बांधण्यात आलेला जुना पूल स्ट्रक्चरल ऑडिटनुसार कमकुवत असल्याचे आढळून आले. या ऑडिटच्या अहवालानंतर महापालिकेने जुन्या पुलावर हलकी वाहने आणि दुचाकी वगळता इतर वाहनांना जाण्यास प्रतिबंध केला.

> चिंचवड रेल्वे स्टेशनजवळ असणाऱ्या पुलावरून जड वाहतूक व बसेस स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालानंतर बंद करण्यात आल्या आहेत. आता रेल्वे विभागाच्या मंजुरीनंतर येथे नवीन पूल उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.
> **–प्रमोद ओंभासे, शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका**

> पिंपरी चिंचवड महापालिकेने नागरिकांच्या सुरक्षेला नेहमीच प्राधान्य दिले आहे. चिंचवड स्टेशनजवळील जुन्या उड्डाणपुलाला जवळपास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. परंतु तज्ज्ञांच्या मूल्यांकनातून आणि नागरिकांच्या अभिप्राय लक्षात घेऊन येथे नवीन पूल उभारण्यात येणार आहे. रेल्वे विभागाची यासाठी मंजुरी मिळाली असून येथे नवीन पूल उभारण्यासाठी कार्यादेश देण्यात आला आहे.
> **– शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**

त्यामुळे येथून जाणारी जड वाहने आणि बसेस यांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत होता.

या पार्श्वभूमीवर, संबंधित पूल पाडून त्याजागी नवीन पूल बांधण्याबाबत महापालिकेद्वारे विविध संस्थांकडून तांत्रिक आढावा घेण्यात आला. २०२१ मध्ये केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये आणि २०२२ मध्ये पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने केलेल्या पुनर्वलोकनानुसार जुना पूल पाडण्याची शिफारस करण्यात आली. त्यानंतर रेल्वे विभागाने डिसेंबर २०२४ मध्ये जुना रेल्वे उड्डाणपूल पाडण्यासाठी आणि नवीन पुलाच्या आधुनिक पुनर्बांधणीसाठी संमती दिली.

---

## एमआयटीच्या प्रा. अक्षदा कुलकर्णींना पीएचडी

### शिक्षण विश्व: ड्रोन सुरक्षा संशोधनात महत्त्वपूर्ण अभ्यास

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एम. आय. टी. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील प्रा. अक्षदा पांडुरंग कुलकर्णी यांनी आपल्या संशोधन कार्याने एक मोठा टप्पा गाठला आहे. त्यांना डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यापीठाने पीएचडी प्रदान केली आहे. त्यांच्या 'मानवरहित हवाई वाहने शोधण्यासाठी आणि त्यांचा मागोवा घेण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अल्गोरिदम' या संशोधनावर आधारित पीएचडी कामाने प्रा. अक्षदा यांनी तंत्रज्ञान आणि सुरक्षा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.**

या अल्गोरिदममध्ये ड्रोनच्या आकार, गती, दिशा आणि स्थान ओळखण्याची प्रक्रिया अत्यंत सुलभ करण्यात आली आहे. आधुनिक काळात लहान ड्रोन किंवा मानवरहित हवाई वाहने विविध उद्देशांसाठी वापरली जातात, पण त्यांचा सुरक्षिततेसाठी उपयोग आणि संभाव्य गैरवापर एक मोठे धोका बनू शकतात. या ड्रोनचा वापर संशोधन, छायाचित्रण, शेती, औद्योगिक क्षेत्रात होतोच, मात्र त्यांचा गैरवापर सुरक्षा क्षेत्रासाठी मोठा धोका निर्माण करतो.



प्रा. अक्षदा कुलकर्णी

यांनी या समस्येवर काम करत, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने एक अभिनव अल्गोरिदम तयार केला आहे, ज्यामुळे ड्रोनच्या आकार, गती आणि दिशेची अचूक ओळख करता येईल. हे अल्गोरिदम सुरक्षा क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरू शकते. मानवरहित हवाई वाहने किंवा ड्रोनला ओळखणे आणि त्यांचा मागोवा घेणे हे क्षेत्रातील एक मोठे आव्हान आहे. प्रा. अक्षदाच्या या संशोधनामुळे हे आव्हान सुलभ होईल, तसेच राष्ट्रीय सुरक्षेसाठी महत्त्वाची सुविधा प्रदान केली जाईल.

या संशोधन कार्यात प्रा. अक्षदा कुलकर्णी यांना डॉ. अतुल नेवसे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. डॉ. नेवसे यांच्या मार्गदर्शनामुळेच या अल्गोरिदमच्या विकासाला गती मिळाली आणि संशोधनाचा दर्जा उंचावला. विद्यापीठाचे कुलगुरू व मार्गदर्शक प्राध्यापकांनी या कार्याचे कौतुक करत सांगितले की, "हे संशोधन केवळ देशाच्या सुरक्षेसाठीच नाही, तर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील विकासासाठी देखील अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल."

महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, सहकारी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी प्रा. अक्षदा कुलकर्णी यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
A
NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046